**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.5 No. 18** **May-June 2024**

# नागपूरच्या प्रशासनात तिसऱ्या रघुजीचे योगदान ( इ.स. 1818 ते इ.स.1853)

**आनंद पी. मेश्राम [1] ,डॉ.कैलास आर.भांडारकर [2]**
[1]शोध विद्यार्थी गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
**Email** - nishigandhmeshram76@Gmail.com
[2]संशोधन मार्गदर्शक
**Corresponding Author - आनंद पी. मेश्राम**

**प्रस्तावना:**

नागपूर जिल्ह्याच्या निश्चित इतिहासाला 16 व्या शतकात गोंड राजघराण्यापासून सुरवात झाली.या घराण्यातील तिसरा राजा बख्तबुलंद याने राजापूर बारसा नावाच्या बारा वाड्या पेठांनी जोडून व त्यांच्या भोवती तट बांधून इ.स.वी सन 1702 मध्ये नागपूर शहर वसविले. बख्तबुलंद चा मुलगा चांद सुल्तान याने इ.स.वी सन 1706 साली नागपूर शहर आपल्या राज्याची राजधानी केली.इ.स.वी सन 1743 मध्ये नागपूर येथे मराठ्यांच्या कारकिर्दीची सुरुवात रघुजी भोसले यांनी केली. भोसल्यांनी नागपूर हे आपल्या राज्यकारभाराचे केंद्र केले. 1 आपल्या राज्यव्यवस्थेचे स्वरूप भोसल्यांनी पेशव्यांप्रमानेच ठेवले होते. भोसल्यांनी स्वतःचे सैन्य,मंत्रिमंडळ आणि दरबार स्थापन केले होते. 2

**तिसऱ्या रघुजीचे राज्यारोहण :**

अप्पासाहेबाला कैद करून त्याला पदच्युत केल्यानंतर औपचारिकरीत्या गादीवर कुणाला बसवायचे हा प्रश्न जेनकिन्सपुढे उपस्थित झाला. कारण मूळ पहिल्या रघुजीच्या वंशातला कुणीही पुरुष शिल्लक नव्हता.या बाबत इंग्रज रेसिडेंट आणि गव्हर्नर जनरल यांच्यात पत्रव्यवहार झाला. 3 त्यात गव्हर्नर जनरल याने दुसऱ्या रघुजीच्या मुलीचा मुलगा याला गादीवर बसवून अप्पासाहेबास पदच्युत करावे असे ठरविले होते.त्याप्रमाणे घोषणा करण्याचा आदेश रेसिडेंट जेंकिंसला दिला. 4 दुसऱ्या रघुजीची मुलगी बनुबाई हिचा मुलगा 5 बाजिबा उर्फ बाजीराव यास राणी बाकाबाईच्या सल्ल्याने दि.25/06/1818 रोजी परसोजीची पत्नी दुर्गाबाई हिच्या मांडीवर देऊन त्याचे नाव तिसरा रघुजी ठेवले. 6 आणि दुसऱ्याच दिवशी रघुजीला नागपूरच्या गादीवर बसविले. 9 ऑक्टोबर 1818 रोजी रघुजीचा राज्यारोहण समारंभ करण्यात आला. 7 गव्हर्नर जनरल लॉर्ड हेस्टिंगने तिसरा रघुजी गादीवर बसल्यावर समाधान व्यक्त करून अभिनंदन केले. 8

**अल्पवयस्क राजाचा राणी बाकाबाईकडे राज्यकारभार :**

तिसरा रघुजी अल्पवयस्क असल्याने राणी बाकाबाई हिने तिसऱ्या रघुजीचे पालकत्व आणि रिजन्ट या नात्याने कारभार करावा तसेच दरबारातील कारभार गुजाबादादा गुजर यांच्या सल्ल्याने करावा अशी व्यवस्था करण्यात आली. 9 परंतु राज्याचे प्रशासन रेसिडेंटच्याच हातात होते.10 सर्व दृष्टीने सर्व कारभार आपल्या हाती घेतल्यानंतर जेनकिन्सने आपल्या विश्वासातील 11 सिद्धिक अलीखान यास मुख्य कारभारी नेमले.12 आणि नागपूर राज्यात तिसऱ्या रघुजीच्या नावाने जाहीरनामा काढला.13 परंतु गव्हर्नर जनरलने राजवाड्याच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करू नये असे रेसिडेंटला बजावल्याने राणी बाकाबाईच्या हातात अंतर्गत कारभाराची सूत्रे आली.राणी बाकाबाईच्या मदतीला गुजाबादादा गुजरला बोलावण्यात आले.पुढे गुजाबादादा गुजर आणि सिद्धीक अलिखान यांचे पटले नाही त्यामुळे

रेसिडेंटने हस्तक्षेप करून राजवाड्याचा कारभार आपल्या हातात घेतला.राणी बाकाबाई ही नावाचीच रिजन्ट राहिली .गुजाबादादा गुजर आणि राणी बाकाबाई यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले.ही परिस्थिती इ.स.1826 पर्यंत होती.14

**तिसऱ्या रघुजीकडे राज्याचे सत्तांतर:**

नागपूर राज्यावरील इंग्रजांचे वर्चस्व कायम नव्हते.तिसरा रघुजी वयात येताच हे वर्चस्व संपणार होते. राजाच्या हाती सत्ता देण्यासाठी आणि ब्रिटिशांचे वर्चस्व समाप्त करण्यासाठीं सर्वोच्च सरकारने रेसिडेंटला सूचना दिल्या.15 रघुजी तिसरा इ.स.1826 साली अठरा वर्षांचा होऊन 16 सज्ञान झाला व त्याचे स्वाधीन राज्याचा सर्व कारभार करावा असे ग.ज.लॉर्ड अमहर्स्ट याने ठरवले.नागपूर राज्याचा कारभार राजाच्या हाती सोपवण्याची

तयारी करून राजाबरोबर नविन तह करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. 17 डिसेंबर इ.स. 1826 मध्ये राजाकडून दरबार भरविण्यात आला.रेसिडेंटने दरबारात तहनामा वाचून दाखविला. तिसऱ्या रघुजीने दरबारातच स्वाक्षरी केली. ग. ज. अमहर्स्ट याने 13 डिसेंबर 1826 रोजी तहावर हस्ताक्षर करून तहाला मान्यता दिली.18

**तिसऱ्या रघुजी सोबत करण्यात आलेले तह :**

तिसरा रघुजी इ.स. 1826 साली अठरा वर्षांचा झाला तेव्हा त्याच्या हाती राज्यकारभार सोपवण्याचे निमित्त साधून त्याच्यावर नवा करार लादण्यात आला. इ.स.वी सन 1816 सालच्या तैनाती फौजेच्या कराराच्या अटी तशाच ठेऊन त्यात काही कलमांची भर टाकण्यात आली. 19 सेनासाहेब सुभा हा किताब कायम ठेवण्यात आला. साताऱ्याचे राजघराणे आणि इतर मराठा संस्थानिक यांचेशी असलेले संबंध आणि मानपान सोडायला सांगण्यात आले.नागपूर राज्यावर तिसऱ्या रघुजीचा अंमल मान्य करण्यात आला.परंतु राज्यकारभाराच्या बाबतीत इंग्रजांचा सल्ला राजावर बंधनकारक करण्यात आला.खजिना आणि सर्व हिशोब तपासण्याचा अधिकार रेसिडेंटकडे देण्यात आला.संरक्षणासाठी आणि महत्वाच्या ठाण्यावर इंग्रजांचे सैन्य ठेवण्यास राजाने मान्यता दिली.अशाप्रकारच्या जाचक अटींसह हा सतरा कलमी तह तिसऱ्या रघुजीवर थोपविण्यात आला.20 महत्वाचे म्हणजे या तहाने राज्यकारभार जरी प्रत्यक्ष तिसऱ्या रघुजीच्या हातात आला असला तरी 21 रेसिडेंटच्या मर्जीबाहेर कोणतेही काम करण्याचा अधिकार राजास राहिला नाही. 22 अशाच प्रकारचा तह इ.स.1829 मध्ये राजासोबत करण्यात आला होता. इ.स. 1826 च्या तहातील कलम नं.8 व 9 ही राजाच्या इभ्रतीस न शोभन्यासारखी व गैरवाजवी आहेत.हे तत्कालीन ग.ज.लॉर्ड बेंटीकच्या लक्षात आले तेव्हा त्याने देशाच्या संरक्षणाकरिता राजाचे सहकार्य आवश्यक आहे.राजाचे स्वातंत्र्य आणि सन्मान कायम राहील आणि ब्रिटिश सरकारच्या आर्थिक साधनात वाढ होईल यासाठी इ.स. 1826 च्या तहात दुरुस्ती करण्याचे ग.ज.ने ठरविले.

राज्याचे कल्याण, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्याचे संवर्धन तसेच परस्पर हित साधण्यासाठी कंपनीच्या आणि राजाच्या सोयीकरिता इ.स.1826 च्या तहातील काही कलमात फेरबदल आणि सुधारणा करण्यात आल्या.कलम 8 व 9 रद्द करण्यात आले.तैनाती फौजेकरिता आठ लक्ष रुपये देण्याचे राजाने मान्य केले.देवगड,चांदा,लांजी, छतीसगड हे जिल्हे राजास देण्यात आले तसेच या तहानुसार राजाला कमीत कमी एक हजार घोडेस्वार ठेवण्याची परवानगी देण्यात आली. 23

तिसऱ्या रघुजी बरोबर झालेला हा अखेरचा महत्वाचा तह होता या तहाने रघुजीला राज्यकारभाराचे अधिकार मिळाले.

**प्रशासनाचे स्वरूप :**

पेशव्यांच्या राज्यव्यवस्थेचे स्वरूप भोसल्यांनी स्वीकारले होते.सेनासाहेब सुभा ह्या पदवीने भोसल्यांना राज्यकारभाराचा कायदेशिर दर्जा प्राप्त झाला होता.भोसल्यांचे स्वतःचे सैन्य, मंत्रिमंडळ आणि दरबार होते.दिवाण हा राज्याचा मुख्य प्रधान होता. राज्याच्या सर्व खात्यांवर देखरेख ठेवण्याचे, परराष्ट्र व्यवहार पाहण्याचे काम दिवाणाचे होते.हा मुजुमदाराचे सुद्धा काम पाही.हे पद अत्यंत महत्वाचे असून त्यावर अत्यंत विश्वासू व्यक्तीची निवड केली जात होती. फडणवीस हा अर्थमंत्री होता. राज्याचे उत्पन्न व खर्च याचा हिशोब,राजाचे आदेश,सनदा व अनुदाने यावर सही करण्याचे काम हा करीत असे.राजाचे सर्व हुकूम पाठवण्याचे कार्य चिटणीस करी.इतर राज्ये आणि शासन प्रमुख इत्यादिकडून आलेल्या पत्राची उत्तरे

पाठवण्याचे कार्य हा करीत असे. राज्याचा खजिनदार म्हणून जामदार काम पाही. राजाच्या जवाहिरखाण्याचा हा प्रमुख होता.राजाचा शिक्का याच्याच ताब्यात असे.बक्षी हा युद्धमंत्री होता. सैन्य भरती करणे व सैन्याचा पगार देणे तसेच युद्ध खर्चाची माहिती ठेवण्याचे काम हा करीत असे.जासूद आणि हरकारे यांच्या प्रमुखाला नाईक म्हणत.हा विदेशी हेरखात्याचा प्रमूख होता. वऱ्हाडपांडे हा अधिकारी फडणवीसांच्या नियंत्रणाखाली राजस्व वसुलीचे काम करीत असे.गोंड राजाच्या कारकिर्दीतील हे पद भोसल्यांनी सुद्धा पुढे तसेच ठेवले.

राज्यकारभाराच्या सोयीसाठी राज्याचे निरनिराळे भाग पाडले जात.त्यावर सुभेदाराच्या नेमणुका होत.यांना लष्करी व मुलकी अधिकार होते.शिवाय यांना खर्चासाठी मोठमोठ्या जहागिऱ्या दिल्या जात.सुभेदार राजाला जबाबदार असत.यांना दर्जानुसार सैन्य घोडेस्वार हत्ती बाळगण्याची अनुमती होती. नागपूरला
नगरनाईक नावाचा अधिकारी असे.सावकाराशी आर्थिक व्यवहार करणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे,प्रसंगी राजाला सल्ला देण्याचे कार्य हा करी. 24

राजस्व वसुली पोलिस आणि न्याय व्यवस्थेच्या बाबतीत नागपूर राजधानीचे प्रशासन वेगळे होते. 25 जुनी न्यायालये आणि पोलिस व्यवस्था पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आली होती.प्रत्येक विभागावर ब्रिटिश अधिकाऱ्याचे नियंत्रण ठेवण्यात आले होते.26 राज्यकारभाराच्या सोयीसाठी नागपूर राज्याची पाच जिल्ह्यात विभागणी करून त्यावर तिसऱ्या रघुजीच्या नावाने इंग्रज अधिकारी नेमण्यात आले.यांना जिल्हाधिकारी व नंतर अधीक्षक म्हणत.हे रेसिडेंटच्या अधिकाराखाली कार्य करीत.

खेड्याचे प्रशासन पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्यात आले.मंदिर व ब्राम्हणांना पूर्वीप्रमाणेच अनुदान आणि दान देण्याची होती. 27 प्रत्येक जिल्ह्यात साधारणपणे एक अधीक्षक आणि 32 कर्मचारी,सदर कचेरीत 7 कर्मचारी,कारागृह विभागात 12 कर्मचारी आणि 80 शिबंदी ,पोलिस विभागात 8 कर्मचारी व 30 शिबंदी इतके कर्मचारी असत.अशाच प्रकारचा कर्मचारी वर्ग परगण्यातही होता. 28

**मंत्रिमंडळ आणि अधिकारी :**

तिसरे रघुजी सरकारने त्यांना गादी मिळवून दिली याबाबत ब्रिटिश सरकारला अनुकूल होते.त्यांची ब्रिटिश शासनाबाबतची निष्ठा आणि प्रेम विश्वास ठेवण्यालायक आहे असे रेसिडेंटला वाटत होते. 29 निष्ठा आणि परस्पर सामंजस्य यामुळे रेसिडेंट वाईल्डरने राजाला आपले मंत्री निवडण्याचे स्वातंत्र्य दिले. तिसऱ्या रघुजी ने सुद्धा मंत्रिमंडळ निवडून स्वतःची न्यायबुद्धी आणि क्षमता सिध्द केली होती.30

आपल्या मंत्रिमंडळामध्ये :-
राजस्व विभाग - नरोबा काळीकर
पोलिस विभाग - सलाउद्दिन अलिखान
जकात विभाग - रामजी तात्या
हिशोब तपासनीस - अमृतराव
कोषागार – जनार्दन
चिटणीस - गंगाधरराव
रेसिडेंट सचिव - यशवंतराव रामचंद्र

यांसारखे विश्वासू आणि प्रामाणिक व्यक्ती नेमले. 31 एवढेच नव्हे तर इ. स. 1829 च्या तहानुसार चांदा, भंडारा, छत्तीसगड आणि छिंदवाडा या जिल्ह्याचे हस्तांतरण तिसऱ्या रघुजीकडे करण्यात आले तेव्हा रेसिडेंटच्या अधिकाराखाली कार्य करणाऱ्या अधीक्षकांनी या जिल्ह्याचा कारभार पाहणे बंद केले तेव्हा या चारही जिल्ह्यावर रघुजीने आपले अधिकारी निवडले होते.

त्यामध्ये छिंदवाडा जिल्ह्याकरिता अशरफ अली, भंडारा जिल्ह्याकरिता यादवराव, छत्तीसगड करिता कृष्णराव अप्पा, चांदा जिल्ह्याकरिता अमृतराव यासारखे अधिकारी पाठवले.32

**राजस्व व्यवस्था :**

भोसल्यांच्या आमदनीत असलेली राजस्व व्यवस्था 33 आणि भोसला राजवटीतील सर्व महत्वाची वैशिष्ट्ये पूर्वीप्रमाणेच तिसऱ्या रघुजीच्या वेळी कायम होती 34 परगण्यातील राजस्व व्यवस्थेत थोडाफार बदल करण्यात आला. भोसल्यांच्या वेळी फडणवीसांचे जे काम होते तेच काम फडणवीस करी.प्रत्येक परगण्यातील खर्चाचा लेखाजोगा त्याला ठेवावा लागे.शेतसारा आकारणी वऱ्हाडपांडे करी तसेच प्रत्येक खेड्यातून शेतसारा वसूल करण्याचे कामसुद्धा हाच करीत असे. कमाविसदार आणि पाटील यांना कोणत्याही

प्रकारचा नवीन कर रयतेपासून घेण्यास पूर्ण बंदी होती 35 शेतकरी ठरल्याप्रमाणे शेतसाऱ्याचा भरणा करीत.खेड्यातील शेतसारा वसूल करण्याची जबाबदारी पाटलाची होती. जमिनीची सुपीकता आणि प्रत्यक्ष उत्पन्न पाहून शेतसारा आकारण्यात येत होता. खेड्यांना शेतीसाठी राजाकडून बी बियाणे देण्यात येई. 36

संपूर्ण राज्याची आणि प्रजाजनाची माहिती प्राप्त करण्याकरिता तिसऱ्या रघुजी ने इ.स.1828 मध्ये संपूर्ण राज्याचा दौरा करून राजस्वसंबंधी अधिक माहिती गोळा केली होती.रघुजीच्या या दौऱ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये

आत्मविश्वास निर्माण झाला होता.37 जिल्ह्याच्या राजस्वाचा हिशोब इंग्रज अधिकारी तिसऱ्या रघुजीकडे पाठवित.शिवाय संपूर्ण जिल्ह्याच्या कारभाराची माहिती राजाला देत 38

नागपूर राज्याच्या राजस्व प्रबांधाच्या बाबतीत कोणतीही नवीन पध्दत तिसऱ्या रघुजीने अंमलात आणली नव्हती.राजाचे मराठी प्रशासन हे लोकांच्या आवश्यतेनुसार स्वीकारले गेले होते. 39 जुन्या पद्धतीनुरुप ही स्थिती नागपूरचे राज्य खालसा होईपर्यंत टिकून होती.40

**न्यायव्यवस्था :**

भोसल्यांच्या कार्यकाळात न्यायव्यवस्थेचा फारसा विकास झाला नव्हता.मुलकी मामल्यांचा निकाल लावण्यासाठी शहरात न्यायालये होती. गुंतागुतीच्या खटल्यात राजा स्वतः लक्ष घालून न्याय देई.अशा प्रसंगी राजा मंत्री व पंचायतीचा सल्ला घेत असे.अन्याय होऊ नये यासाठी राजा स्वतः दक्ष राहात होता.सर्वसामान्यांनाही न्याय मिळावा यासाठी राज दरबार कटिबद्ध असे. विशेष गुन्ह्यात मृत्युदंड दिला जाई.अट्टल गुन्हेगारांना सीताबर्डीच्या टेकडीवर एका घरात ठेवल्या जात होते. तुमसर जवळ अंबागड किल्यातही तुरुंग होता.41

रघुजीच्या कार्यकाळात न्याय देण्याचे कार्य योग्य होते.प्रजा क्षुल्लक बाबतीतही राजाकडे आपली गाऱ्हाणी मांडण्यास अनमान करीत नसत.राजा प्रजेमध्ये लोकप्रिय होता.42 प्रजेच्या तक्रारी आणि दुःख राजा ताबडतोब दूर करी.43 ज्या गुन्हेगाराला फाशीची शिक्षा झाली आहे आणि असा गुन्हा सिध्द झाला तर राजा अंतिम आदेश देत असे.44 राजाच्या लिखित आज्ञेवरून मोठया गुन्ह्याकरिता देहदंड दिला जात होता.45

दुय्यम आणि लहान न्यायालय पोलिस अधीक्षकांच्या नियंत्रणाखाली होते.या न्यायालयात दरोगा प्रमुख होता.जिल्ह्यात दिवाणी खटले अधीक्षकांकडे जात आणि परगण्यात कमाविसदाराकडे. साधारणपणे पंचायतीचा वापर जास्तीतजास्त होत होता. परगण्यातील खटल्यांचे निर्णय कमाविसदार स्वतः पंचायती मार्फत देत.खून राजद्रोहाचे खटले वरिष्ठ न्यायालयात आणि इतर खटले दुय्यम न्यायालयात सूनावणिकरिता जात 46 "माझ्या कारकिर्दीत फक्त पाच व्यक्तींना गुन्ह्याकरीता देहान्त शिक्षा देण्यात आल्या.नागपूर प्रांतातील लोक शांतता प्रेमी अनाक्रमक सुखी आणि समाधानी आहे असे तत्कालीन रेसिडेंट वाईल्डर आपल्या अहवालात म्हणतो.47

**पोलिस व्यवस्था :**

नागपूर राज्यात पोलिस व्यवस्था निर्माण करण्याचे कार्य रेसिडेंट जेनकिंस याने केले .ही व्यवस्था इ.स.1819 मध्ये नागपूर नगरात अस्तित्वात आणली.यासाठी नागपूर नगरीचे आठ भागात विभाजन करण्यात आले.प्रत्येक विभागात सुभेदार दफादार नाईक आणि शंभर शिपाई राहात.राज्यात शांतता ठेवणे गुन्हेगारीला आळा घालने प्रजेला संरक्षण देणे ही कामे सुभेदाराची होती.प्रत्येक खेड्यात पोलिस पाटील हेच पोलिस अधिकारी असत.48 पोलीस प्रशासनात रेसिडेंट जेनकिन्स ने निर्माण केलेली व्यवस्था तिसऱ्या रघुजीने सत्ता हातात आल्यानंतरही शेवट पर्यंत कायम ठेवली.त्याने स्थापन केलेले पोलीस ठाणे आणि नियुक्त केलेले कर्मचारी यात बदल केला नाही.49 इ.स. 1840 मध्ये पाठविलेल्या अहवालात पोलीस पूर्वीपेक्षा अधिक भ्रष्ट झाले आहेत असे रेसिडेंट विल्किंस म्हणतो.यावेळी तिसऱ्या रघुजीच्या आज्ञेनी भ्रष्ट पोलिसांना बडतर्फ करण्यात आले होते.50

**तिसऱ्या रघुजीचे लष्कर :**

नागपूरपासून भंडारा रोडवरील पारडी येथे तिसऱ्या रघुजीची लष्करी छावणी होती.महाराजा रघुजीच्या नावावरून पारडीला महाराज गंज असेही म्हणत.दुसरी लष्करी छावणी सोनेगाव येथे होती. पारर्डीच्या सैन्यात युरोपियन पद्धतीने शिकवलेले

कवायती सैन्य व काही तोफा होत्या. नागपूर राज्यात स्थानिक किंवा कॉटिनजेन्ट सैन्य नव्हते. इ.स.1816 च्या तहानुसार मद्रास रेसिडेन्सी मधून ब्रिटिश सैन्याची एक तुकडी नागपूरला ठेवली होती हीच तैनाती फौज होती.ह्या तैनाती फौजा नागपूरपासून 9 मैलावरील कामठी येथे होत्या.

या सैन्याचा उपयोग राजाच्या रक्षणाकरिता, बंड शमविण्याकरिता आणि इतर महत्वाच्या कार्यात होत असे. सैन्याचे युद्ध साहित्य सीताबर्डीच्या किल्यात ठेवीत व किल्ल्याच्या संरक्षनाकरिता 18 वी रेजिमेंट ठेवण्यात आली होती.या सैन्याने इ.स. 1842-43 च्या युद्धाविरुद्ध कामगिरी बजावली होती.पारडीला या सैन्यात 1 मेजर,1 कॅप्टन व तोफखान्याचा लेफ्टनंट तसेच घोडदळाचे अधिकारी समाविष्ट असत.

सैन्याचा फार मोठा भाग विविध जिल्ह्यात ठेवण्यात आला होता. त्यांच्याकडे राज्यात शांतता आणि सुव्यवस्था सुरक्षितता ठेवणे व आवश्यता पडल्यास राजस्व वसूलीसाठीही मदत करीत.51 इ.स. 1845 मध्ये पारडी येथे सैन्याने दंगा केला तेव्हा रेसिडेंट च्या सल्ल्याने रघुजीने बंडखोरापैकी 217 सैनिक व अधिकारी बडतर्फ केले होते.52

**उपसंहार :**

नागपूर हे आपल्या राज्यकारभाराचे केंद्र करून पहिल्या रघुजीने मध्यभारतात मराठ्यांच्या राज्याची मुहूर्तमेढ रोवली होती.त्यांनी आपल्या प्रशासन व्यवस्थेचे स्वरूप हे थोड्या फार फरकाने पेशव्यांप्रमानेच ठेवले होते. अप्पासाहेबाला पदच्युत करून दत्तक पुत्र तिसऱ्या रघुजीला नागपूरच्या गादीवर बसविण्यात आले.तेव्हा तिसरा रघुजी अल्पवयीन होता त्यामुळे राज्याचा अंतर्गत कारभार दुसऱ्या रघुजी ची पत्नी राणी बाकाबाई हिच्याकडे सोपविण्यात आला. इ.स.1826 मध्ये राजा वयात आला.त्याचे हाती राज्यकारभार सोपविण्याचे निमित्त करून ब्रिटिश सरकारने त्यांचेवर करणार लादला.तत्कालीन रेसिडेंट जेनकिन्स याने यात महत्वाची भूमिका बजावून राज्याच्या प्रशासनावर स्वतःची पकड मजबूत केली.राजा आणि राणी बाकाबाई नाममात्र कारभारी राहिले.

मात्र ग.ज.लॉर्ड बेंटीक च्या पुढाकाराने इ स 1826 च्या तहातल्या जाचक अटी काढून इ स 1829 चा करार करून राज्यकारभार राजाच्या स्वाधीन करण्यात आला.राजाने जातीने राज्यकारभाराकडे लक्ष दिले.त्याने स्वतःचे मंत्रिमंडळ निवडले.इ स 1829 च्या तहाने मिळालेल्या चार जिल्ह्यावर जिल्हाकर्त्यांची नेमणूक केली.निश्चित राजस्व ठरविण्यासाठी राजाने आपल्या राज्याची पाहणी केली. शेतसारा योग्य वसूल केला जातो की नाही यावर लक्ष घालून राजाने भ्रष्ट व्यवहाराला आळा घातला.इंग्रज अधिकाऱ्यांकडून जिल्ह्याचा हिशोब घेत, राज्याच्या संपूर्ण कारभाराची माहिती राजा स्वतः ठेवीत.

न्यायव्यवस्थेचा फारसा विकास झाला नव्हता. बहुतांस निर्णय हे पंचायतीच्या सल्ल्यानेच होत असत. गुंतागुंतीचे प्रकरण राजा स्वतः लक्ष घालून सोडवित होता. गुन्हेगारांना आंबागड सीताबर्डी किल्ल्यात एका घरात ठेवल्या जात होते. मोठया गुन्ह्या करिता राजाच्या आदेशाने शिक्षा दिल्या जात होती. तिसऱ्या रघुजीच्या कार्यकाळात गुन्हेगारीचे प्रमाण अत्यल्प होते.

नागपूर राज्यात पोलिस व्यवस्था रेसिडेन्स जेनकिन्स ने निर्माण केली होती. राज्यात शांतता आणि सुव्यवस्था ठेवण्याचे काम यांनी केले. रेसिडेंट ने निर्माण केलेले पोलिस ठाणे आणि नियुक्त केलेले कर्मचारी राजाने कायम ठेवले होते.रघुजीची लष्करी छावणी पारडी आणि सोनेगाव येथे होती.या लष्करानी इ स 1842-43 च्या युद्धात महत्वाची कामगिरी केली होती.

तिसऱ्या रघुजीने राज्याच्या प्रशासन, राजस्व, न्याय, पोलिस, आणि लष्करी व्यवस्थेत जातीने लक्ष्य देत राज्यात शांतता प्रस्थापित केली होती.

**संदर्भग्रंथ सूची :**

1) डॉ. पाठक अरुणचंद्र श. महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर नागपूर जिल्हा भाग 1, 2005 पृ.907

2) काळे या. मा. नागपूरकर भोसल्यांचा इतिहास 1979 पृ.432

3) नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्ड VOL IV.L.46. पृ.72

4) डॉ.अंधारे भा.रा.नागपूरचे भोसले 1730 ते 2002 पृ.312

5) डॉ.कोलारकर श.गो., पुरंदरे गो.मा. नागपूर राज्याचा अर्वाचीन इतिहास इ स 1699-1860 पृ.250

6) वही पृ.250

7) सरदेसाई गो.स.कुलकर्णी कुलकर्णी कृ. पा. काळे या. मा.ऐतिहासिक पत्रव्यवहार 1933 ले.424 पृ.297

8) नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्ड VOL IV L 46 P.73

9) डॉ.अंधारेभा.रा.नागपूरचे भोसले1730 ते 2002 पृ.314

10) काळे या. मा. नागपूरकर भोसल्यांचा इतिहास पृ.327

11)डॉ.अंधारे भा.रा. नागपूरचे भोसले 1730 ते 2002 पृ.314

12) काळे या. मा. नागपूरकर भोसल्यांचा इतिहास पृ.327

13) नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्ड VOL 4 L.46 पृ.43

14) सिन्हा आर. एम. द भोसला ऑफ नागपूर द लास्ट फेस 1967 पृ.114

15) नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्ड VOL. IV.L.46 पृ.73

16) कॅप्टन जि.रॅमसे- रिपोर्ट ऑन नागपूर स्टेट डाऊन टू 1845. असिस्टंट रेसिडेंट

17) काळे या.मा.नागपूरकर भोसल्यांचा इतिहास पृ.327

18) रॅमसे रिपोर्ट पृ.25

19) जेनकिन्स रिचर्ड,रिपोर्ट ऑन द टेरीटोरिज ऑफ द राजा ऑफ नागपूर खंड-1827 पृ.40

20) Aitchison - A collection of Treaties Engagement and sands VOL. l 1909 P.431

21) काळे या.मा.नागपूरकर भोसल्यांचा इतिहास पृ.328

22) जेनकिन्स रिचर्ड, सप्लीमेन्ट ऑन द टेरीटोरिज ऑफ द राजा ऑफ नागपूर पृ.40

23) Aitchison - A collection of Treaties Engagement and sands VOL.I 1909 P.434

24) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर नागपूर जिल्हा भाग 1 2005 पृ.177

25) जेनकिन्स रिचर्ड, सप्लीमेन्ट ऑन द टेरीटोरिज ऑफ द राजा ऑफ नागपूर 1827 पृ.34

26) सिन्हा आर. एम. द भोसला ऑफ नागपूर द लास्ट फेस 1967 पृ.113

27) जेनकिन्स रिचर्ड,रिपोर्ट ऑन द टेरीटोरिज ऑफ द राजा ऑफ नागपूर खंड-21827 पृ.34

28) सिन्हा आर. एम. द भोसला ऑफ नागपूर द लास्ट फेस 1967 पृ.115

29) Foreign political consultation 27th March 1837 No.31

30) Foreign political consultation 22th Feb. 1828 No.25

31) सिन्हा आर. एम. द भोसला ऑफ नागपूर द लास्ट फेस 1967 पृ.169

32) नागपूर रेसिडेन्सी रेकॉर्ड VOL.IV.L.40 पृ.266

33) सिन्हा आर. एम. द भोसला ऑफ नागपूर द लास्ट फेस 1967 पृ.118

34)) जेनकिन्स रिचर्ड,रिपोर्ट ऑन द टेरीटोरिज ऑफ द राजा ऑफ नागपूर खंड-1 1827 पृ.96

35) सिन्हा आर.एम. पृ 119

36) जेनकिन्स रिचर्ड, सप्लीमेन्ट ऑन द टेरीटोरिज ऑफ द राजा ऑफ नागपूर 1827 पृ.100

37) सिन्हा आर.एम. पृ 172

38) Aitchison - A collection of Treaties Engagement and sands VOL.l 1909 P.428

39) जेनकिन्स रिचर्ड, 1827 पृ.96

40) सिन्हा आर.एम. पृ 130

41) महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर नागपूर जिल्हा भाग 1 2005 पृ.178

42) सिन्हा आर.एम. पृ 170

43) सिन्हा आर.एम. पृ 171

44) सिन्हा आर.एम. पृ 172

45) जेनकिन्स रिचर्ड, 1827 पृ.16

46) जेनकिन्स रिचर्ड, 1827 पृ.16

47) सिन्हा आर.एम. पृ 172

48) जेनकिन्स रिचर्ड, 1827 पृ.15

49) सिन्हा आर.एम. पृ 186

50) Foreign political consultation 13th July. 1840 No.97

51) रॅमसे रिपोर्ट पृ.35

52) The Escheat of the Nagpur State the arrengement for the administration Of the New province and the Settlement of the affairs of Bhosala Family (Gov.Pub)1853-54 P.78